पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या योजनेकरीता सन २०१७-१८ मध्ये निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सांख्यिकी -२०१७/प्र.क्र.१४९/११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
तारीख: ११ जानेवारी, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.१८.०४.२०१७
२) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र २-३/२०१७/ASI-ES, दि.१८.०५.२०१७
३) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र २-३/२०१७/ASI-ES, दि.२०.०९.२०१७
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.सां.-४/आयसीएस/४२/२०१७, दि.२९.०९.२०१७
५) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य -२०१७/प्र.क्र.२५/११-अे, दि.१३.१०.२०१७
६) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र २-३/२०१७/ASI-ES, दि.२४.११.२०१७
७) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.सां.-४/आयसीएस/४२/२०१७, दि.२९.११.२०१७
८) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. सांख्यिकी-२०१७/प्र.क्र.१४८/११-अे, दि.२७.१२.२०१७

प्रस्तावना -

पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या योजनेकरिता केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्याकरिता उपरोक्त दिनांक १८.०५.२०१७ च्या पत्रान्वये रु.१००.०० लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाने पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या योजनेकरीता रु.१००.०० लाख इतक्या रकमेस दि.२७.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

२. पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेतील २२ अस्थायी पदे दिनांक १ आक्टोबर, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत चालू ठेवण्यास उपरोक्त दिनांक १३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

३. पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना ही योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून केंद्र शासनाकडून दि.२०.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर योजनेसाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी पहिला व दुसरा एकत्रित हप्ता रु. ३३.९२ लाख इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. तसेच दि.२४.११.२०१७ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडून रु.२५.०० लाख इतक्या रकमेचा तिसरा हप्ता प्राप्त झालेला असून तिन्ही हप्त्यांची मिळून रु.५८.९२ लाख इतकी रक्कम मासिक निधी वित्तीय प्रणालीवर वितरीत करण्याची विनंती कृषि आयुक्तालयाने केली आहे. आता कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावानुसार पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना या योजनेसाठी पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या हप्ता्यांद्वारे केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पिकांचे आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून या योजनेकरिता सन २०१७-१८ साठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्यांची एकत्रित रु. ५८.९२ लाख इतकी रक्कम पुढील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार बाबनिहाय वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपये लाखात)

अ.क्र.	बाब	सन २०१७-१८ मध्ये वितरीत करावयाची बाबनिहाय रक्कम (प्रथम, व्दितीय व तृतीय एकत्रित हप्ता)
१	०१-वेतन	५२.९२
२	११-देशांतर्गत प्रवास खर्च	२.००
३	१३-कार्यालयीन खर्च	४.००
४	१६-प्रकाशने	०.००
५	२४-पेट्रोल व वंगण	०.००
एकूण		**५८.९२**

२. प्रस्तुत खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा -

"मागणी क्रमांक डी-३, २४०१, पीक संवर्धन,
(००) (१११) कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी
(००) (११) पिकांच्या आकडेवारीत सुधारणा करण्याची योजना,
(१०० टक्के केंद्र पुरस्कृत) (२४०१ २५७८)"

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१११२३५४६७००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajesh Bajirao Ghadge

Digitally signed by Rajesh Bajirao Ghadge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf72ed51d101be222757ea3b6d64ed5fc5de8f852 9121e097e2203b90069afce, cn=Rajesh Bajirao Ghadge
Date: 2018.01.11 12:38:48 +05'30'

(रा.बा.घाडगे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

२) कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५) सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
६) महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९) वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०) नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२) सहसचिव (११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३) कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३
१४) निवड नस्ती, का.११-अे.